# मराठी पत्रकारितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे प्रतिबिंब

**डॉ. शुभांगी सदाशिव माने** म्हैसाळ महाविद्यालय ,म्हैसाळ ता.मिरज, जि. सांगली मो.9604147294

---

**प्रस्तावना:-**

भारतीय समाजाचे सामाजिक चिंतन करणाऱ्यांमध्ये महात्मा फुले ,सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, आगरकर ,लोकहितवादी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यासारखे अनेक विचारवंत, समाज सुधारक निर्माण झालेले दिसून येतात. त्यामध्ये अग्रक्रमाने नाव घ्यावे लागते ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे.समाजाचे सामाजिक -सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्वच स्तरातून अध्ययन करण्याचे काम डॉ. आंबेडकर यांनी केलेले आहे.

थोर विधीशास्त्रज्ञ ,अर्थशास्त्रज्ञ ,राज्यशास्त्रज्ञ एक शिक्षण संस्थापक दलित उद्धारक, ज्ञानपीपासू ग्रंथवेडे ,व्यक्तीमत्व, ज्ञानसूर्य, प्रज्ञासूर्य, सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार करून लोकशाहीची मुल्य शिरोधर्थ मानणारे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या चार आधारभूत तत्वांचे पुरस्कर्ते आणि दलित, शोषित पीडित लोकांच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे एक खंबीर पत्रकार म्हणजेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

गोषवारा:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असे पत्रकार होते की, त्यांच्यात विचारवंत, विश्लेषक, समाजसुधारक, लोकशिक्षक, सत्याग्रही, नेतृत्व शील आत्मप्रत्ययी अशी सारी गुणग्राहकता धरून त्यांची पत्रकारिता आकाराला आली होती. त्यामुळेच बाबासाहेबांच्या झुंजार पत्रकारितेने सर्वसामान्यांचा आवाज होऊन एक युग घडविले. बाबासाहेबांच्या काळात त्यांच्या पत्रांनी त्याच्या लेखनीने अन्यायाला वाचा फोडण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. वृतत्रातून चालू स्थितीचे दर्शन घडत असते. समाजाच्या प्रगतीसाठी वर्तमानपत्रे महत्वाची भूमिका बजावतात, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी वर्तमानपत्रांसारखे दुसरे माध्यमच असू शकत नाही, असे डॉ. आंबेडकर म्हणत त्यांची विचारधारा संपूर्ण मानव समाजाच्या उद्धारासाठी होती. नैसर्गिक अधिकारापासून वंचित असणाऱ्या समाजात स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले. चातुरवर्ण ,जातीयता आणि सर्व प्रकारच्या शोषणविरुद्ध लढण्यासाठी मृतवत झालेल्या अस्पृश्य समाजास जागे करून त्यांचे खंबीरपणे नेतृत्व केले. केवळ नेतृत्वच केले नाही तर त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून दिले. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध विपूल लेखन करून दलित समाजाला संघटित व्हा असा संदेश दिला. त्यासाठी त्यांनी मूकनायक,बहिष्कृत भारत, समता, प्रबुद्ध भारत यासारखी वृत्तपत्रे आणि पाक्षिके सुरू केली.

भारतीय पत्रकारितेतील मुख्य प्रवाह:-

भारतीय पत्रकारितमध्ये सामान्यतः तीन मुख्य प्रवाह प्रामुख्याने आढळून येतात. (.१) पहिला प्रवाह हा द्वैभाषिक वृत्तपत्रांचा असून, ही वृतपत्रे नागर पत्रकारितेचे प्रतिनिधित्व करताना आढळतात. ही नागर पत्रकारिता नागर संस्कृतीचे हितसंबंध जपणारी असून नागर जीवनातील घडामोडी आणि प्रश्नांकडे अधिकअधिक लक्ष देणारी असल्याचे आढळून येते.नागर पत्रकारितेचा प्रवास दीर्घकालीन असून या पत्रकारितेने भारतीय पत्रकारितेचा इतिहास प्रामुख्याने अधिकाधिक प्रमाणात व्यापलेला आहे. द्वैभाषिक पत्रकारितेकडून भाषिक पत्रकारितेकडे वाटचाल करणाऱ्या पत्रकारितेने भारतीय पत्रसृष्टीच्या इतिहासात अनेक मूलगामी बदल घडविलेले दिसून येतात. जेम्स ऑगस्ट हिकी यांच्यापासून भारतीय आंग्ल पत्रकारितेला प्रारंभ झाला. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात या पत्रकारितेतला प्रारंभ झाला. या पत्रकारितेतूनच भारतीय द्वैभाषिक आणि त्यानंतर भाषिक वृत्तपत्राचा उदय झालेला दिसून येतो.

मराठी भाषिक वृत्तपत्रसृष्टीच्या प्रारंभीचा काळ हा द्वैभाषिक नियतकालिकांचाच होता. अगदी बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' पासूनच हा प्रारंभ झालेला आहे. 1832 ते 1877 पर्यंत मराठी भाषेत जी वृत्तपत्रे, विशेषतः नियतकालिके होती. ती भारतीय समाजाच्या प्रबोधनासाठी लोककल्याणासाठी लोकजागृतीसाठी होती. तरीही भारतात खेड्यापाड्यातून विखुरलेल्या ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब या नियतकालिकातून किती प्रमाणात प्रतिबिंबित होते, हा महत्वाचा प्रश्न आहे.

1877 च्या सप्टेंबर महिन्यात 24 तारखेला 'दिनबंधू' या नियतकालिकाचा प्रारंभ झाला. आणि महात्मा फुले यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या या नियतकालिकेने भाषिक पत्रकारितेतून व आपल्या संपादकात्वातून ग्रामीण जीवनातील आणि ग्रामीण संस्कृतीमधील प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. 'दिनबंधू' 'दिन मित्र' 'शेतकऱ्यांचा कैवारी' 'आंबालहरी' 'विजयी, मराठा', ब्राह्मणेतर, हंटर. सत्यवादी, पुढारी, समता या वृत्तपत्रे आणि नियतकालिकानी', महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजापासून प्रेरणा घेऊन, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शेतकरी, कामगार, शेतमजूर दलित, पददलितांच्या

प्रश्नांची दखल घेतली आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गतिमान केले. या दुसऱ्या प्रवाहातील नियतकालिके आणि वृत्तपत्रांपासून प्रेरणा घेऊन अठराव्या शतकाच्या दशकात दलितांच्या पत्रकारितेचा उदय झालेला आढळून येतो.गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, कि. फा. बनसोडे यांनी दलितांच्या पत्रकारितेला प्रारंभ केला.२)

31 जानेवारी 1920 पासून बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायकची स्थापना करून दलित पत्रकारितेचा पाया भक्कम केला. नागर पत्रकारिता आणि ग्रामीण पत्रकारिता, हे जर मराठी भाषिक पत्रकारितेचे प्रवाह मानले तर दलित पत्रकारिता हा या पत्रकारितेचा तिसरा प्रवाह ठरतो. दलितांची पत्रकारिता ही जरी 18 व्या शतकाच्या अखेरीला सुरु झालेली असली तरी ही पत्रकारिता फारच अल्पजीवी ठरल्याचे दिसते.त्यामुळे दलित पत्रकारितेचा खरा प्रारंभ हा 19 व्या शतकाच्या दुसऱ्या दशकातच खऱ्या अर्थाने झाला असल्याचे दिसून येते.३

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित पत्रकारिता:-

बाळशास्त्री जांभेकर, आगरकर लो. टिळक, म. गांधी यांची पत्रकारिता ही इंग्रजांच्या पारतंत्र्यातून त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी होती. मात्र डॉ. बाबासाहेब आबेडकरांची पत्रकारिता या परतंत्र देशातील इथल्याच उच्चवर्णांकडून पारतंत्र्यात असलेल्या दलित अस्पृश्य समाजाच्या

उत्थानाकरिता सतत परखड विचार मांडत होती. आणि यात त्यांना मोठे यश प्राप्त झाले होते. त्यांनी मराठी पत्रकारितेत नवीन आणि प्रभावी मतप्रवाह 'दलित पत्रकारिता' या नावाने सुरू केला.त्यामुळेच दलित पत्रकारितेला खऱ्या अर्थाने वळण देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या पत्रकारितेने केले असेच म्हणावे लागेल. वर्णव्यवस्था ,रूढी परंपरा, अंधश्रद्धा , ब्राह्मणांचे वर्चस्व यावर जोरदार हल्ला चढवून ते कवच भेदून काढले व शिक्षणाची सर्व द्वारे दलित वर्गासाठी खुली केली. इथल्या प्रस्थापित मराठी पत्रकारितेला बहुजन समाजाच्या व्यथा वेदना, हाल अपेष्टा यांची जाणीव नव्हती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारितेच्या माध्यमातून यांना वाचा फोडण्याचे काम केले परिणामी यातून पुढे मूकनायकाचा जन्म झाला.४)

डॉ बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे :-

वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजउन्नती करण्यासाठी आणि दलित समाजाला जागृत करण्यासाठी डॉ. आंबेडकर यानी मुकनायक, बहिष्कृत भारत ,समता, जनता आणि प्रबुद्ध भारत यासारखी वृतपत्रे सुरु केली त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे

(1) मूकनायक:-

'मूकनायक' हे पाक्षिक 31 जानेवारी 1920 या दिवशी काढून आंबेडकरांनी भारतीय मूक समाजाचे धुरिणत्व पत्करले आणि आपल्या युगप्रवर्तक कार्याची मुहूर्तमेढ रोवली"(५.) हे पाक्षिक मुंबईहुन निघत असे. पाडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादन केले. कारण त्यावेळी आबेडकर हे सिडनेहैम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करीत होते. त्यामुळे त्यांना उघडपणे संपादकपदावर कार्य करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांची नेमणूक केली होती. पहिल्या अंकातील 'मनोगत' नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी स्वतः लिहल्ला होता. पुढील तेरा अंकातही त्यांनी लेख लिहिले. मूकनायकासाठी छत्रपती शाहू महाराजांनी 2500 रुपयांची आर्थिक मदत दिल्याचाही उल्लेख आढळून येतो.(६)

अस्पृश्यत्येचा कलंक नष्ट करण्याच्या दृष्टीने तो काळ किती प्रतिकूल आणि कठोर होता याची कल्पना पुढील गोष्टीवरून येते. आपल्या वर्तमानपत्रात 'मूकनायकाबद्दल' दोन शब्द लिहा अशी केसरीकारांना आंबेडकरांनी विनंती केली .त्यांच्या विनंतीनुसार केसरीकारानी तसे दोन शब्द तर लिहले नाहीतच, पण जाहिरातीचे पैसे देऊ केले असता ती जाहिरात सुद्धा छापण्याचे केसरीकारांनी नाकारले.ह्या घटनेवेळी लोकमान्य टिळक हयात होते. या उदाहरणावरून त्याकाळी समाजात असलेली अस्पृश्यतेची दाहकता समजून येते.

'मूकनायकाच्या' पहिल्याच अंकात आपल्या पाक्षिकाच्या उद्देशाचे समर्थन आंबेडकरांनी अगदी सुबोध, सरळ नि स्पष्ट भाषेत वाचकांपुढे विचारार्थ मांडले. ते म्हणाले, हिंदूस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदू समाज हा एक मनोरा आहे आणि एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला आहे. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास त्यात मार्ग ठेवलेला नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्यांनी त्याच मजल्यात मरावे खालच्या मजल्यातील इसम मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील माणूस, मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कोणाची हिमत नाही. सचेतन त्याचप्रमाणे अचेतन वस्तू ही सारी ईश्वराची रूपे आहेत असे म्हणणारे स्वधर्मीयांचा विटाळ मानतात . सांप्रत ब्राह्मणांची महत्वकांक्षा ज्ञानसंचय करण्याकडे आहे. ज्ञानाचा प्रसार करण्याकडे नाही. ब्राह्मणेत्रांच्या

अवनतीचे कारण सत्ता व ज्ञान यांचा अभाव. ह्या अभावामुळे ब्राहमणेतर मागासले व त्यांची उन्नती खुंटली, युगानयुगे चालत आलेले दास्य, दारिद्रय ह्यापासून बहिष्कृत वर्गाची मुक्तता करण्यासाठी आकाशपाताळ एक केले पाहिजे. त्यांच्या डोळयात ज्ञानाचे अंजन घालून त्यांना आपल्या हीन परिस्थितीची जाणीव करून दिल्ली पाहिजे"

दुसऱ्या एका लेखात डॉ. आंबेडकर म्हणतात "भारत स्वतंत्र होण्यानेच सर्व कार्यलाभ साधेल असे नाही भारत हे असे राष्ट्र बनले पाहिजे की,ज्यात प्रत्येक नागरिकाला धार्मिक आर्थिक आणि राजकीय हक्क सारखे असून व्यक्तीविकासाला प्रत्येक नागरिकाला वाव मिळेल, इंग्रजी राज्याविरुध्द घेतलेला आक्षेप ब्राह्मणांच्या मुखात एकपटीने शोभतो तर तोच आक्षेप ब्राहमणी राज्याविरुद्ध एखाद्या बहिष्कृताने घेतल्यास हजार पटीने शोभेल. हे विधान अप्रस्तुत व अवास्तव आहे असे म्हणणारा कोणी पामर सापडेल असे दिसत नाही. इंग्रजी राज्यात ज्याची बात सहन होत नव्हती त्यांची लाथ खावी लागणारा म्हणून असे स्वराज्य द्या की ,त्यात थोडेबहुत आमचे राज्य आहे.( 7)

थोडक्यात असे म्हणता येईल की, मुकनायक पाक्षिकाने मुक्याच्या वेदनांना वाचा फोडली निराधारांना आधार दिला. विचाराना प्रेरणा दिली. परंतु पुढील शिक्षणासाठी आंबेडकरांना परदेशात जाव लागल्यामुळे आणि आर्थिक बाजू कमकुवत झाल्यामुळे 'मूकनायक' पाक्षिक बंद पडले.

बहिष्कृत भारत-

1927 मध्ये बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत' 'नावाचे पाक्षिक सुरु केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडवण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव बाबासाहेबाना होती. त्यामुळेच त्यांनी 'बहिष्कृत भारत' या पक्षाची सुरुवात केली

अन्याय, रूढी परंपरा ,अंधश्रद्धा ,प्रथा गैरसमज, दीर्घकालीन गुलामगिरीतून खालच्या समाजाला मुक्त करण्याचे कार्य त्यांनी या बहिष्कृत भारत पाक्षिकातून केले. शोषणविरहित समाज घडवण्यासाठी आत्मजागृती हवी तसेच त्या शोषणापासून दूर होण्याची अस्मिता जागृत होईल यासाठी बहिष्कृत भारत या पक्षातून जनजागृती केली.

बाबासाहेबांनी समाजातील वंचित शोषित पददलित आणि पीडित लोकांना न्याय मिळवून देण्याचे व समाज परिवर्तनाचे कार्य या पाक्षिकातून केले निरक्षर जनतेला नवी जागा द्यावी, त्यांनी आपली योग्यता शिक्षणातून प्राप्त करून घ्यावी, त्यांनी आपल्या जीवनाला नवा अर्थ प्राप्त करून घ्यावा, आणि आपले जीवन सार्थकी लावावे यासाठी आंबेडकरांनी आत्मसाह्य आत्म स्वावलंबन आणि आत्मसन्मान हरवून जगणे लांचनास्पद आहे असे त्यांना वाटत होते.डॉ.आंबेडकरांना माणसांना पशुतुल्य अस्तित्वाच्या पातळीवरून सदगुण आणि सात्विकतेच्या पातळीपर्यंत उन्नत करायचे होते त्यामुळे सामाजिक परिवर्तनासाठी साधन म्हणून या पाक्षिकाचा त्यांनी उपयोग केल्याची दिसून येते.(८)

बहिष्कृत भारत या पाक्षिकाच्या 25 नोव्हेंबर 1927 च्या अग्रलेखात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात संसाराच्या उपाधीतून मुक्त झालेल्या किंवा संसाराच्या उपाधीत न अडकलेल्या 5000 अस्पृश्य तरुणांचे एक सत्याग्रह दल तयार करावे व त्या दलामार्फत जेथे जेथे सत्याग्रह करण्याची गरज असेल तेथे सत्याग्रह पुकारावा कारण सत्याग्रह केल्याशिवाय दलित वर्गाला न्याय मिळू शकणार नाही असे त्यांचे ठाम मत होते(.9 )

समता:-

समता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेले एक वृत्तपत्र होते. या वृत्तपत्राचे प्रकाशन 29 जून 1928 रोजी झाले. हे वृत्तपत्र डॉ. आंबेडकरांद्वारा समाज सुधारहेतू स्थापित संस्था समता संघाचे (समता सैनिक दलाचे )मुखपत्र होते. याचे संपादक म्हणून बाबासाहेबांनी देवराव विष्णू नाईक यांची म्हणून नियुक्ती केली होती.

जनता/प्रबुद्ध भारत:-

जनता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेले एक वृत्तपत्र होते. या वृत्तपत्राचा पहिला अंक 24 नोव्हेंबर 1930 रोजी प्रकाशित झाला. याचे संपादक देवराव विष्णू नाईक होते .त्यानंतर गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे हे जनताचे संपादक झाले .जनता प्रारंभी पाक्षिक होते. 31 ऑक्टोबर इसवी सन १९३० रोजी ते साप्ताहिक झाले. जनता वृत्तपत्राची बिरुदावली म्हणून' 'गुलामवाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' हे वाक्य होते. या वृत्तपत्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिले तसेच जनतेतून विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून पाठवलेली पत्रे प्रकाशित झाली होती.

इसवी सन 1955 पर्यंत जनता सुरू होते. या वृत्तपत्राचे संपादन वेळोवेळी बदलले त्यामध्ये अनियमितपणा निर्माण झाला. परंतु तरीही ते खूप दिवस टिकले 4 फेब्रुवारी इसवी सन 1956 रोजी जनताचे नामकरण 'प्रबुद्ध भारत' असे करण्यात आले(.१०)

या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी हजारो वर्षे चालत आलेल्या भारतीय समाज व्यवस्थेविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला आपल्या बांधवांना संघटित करून अन्यायविरुद्ध संघर्ष करण्यासाठी आणि न्याय हक्कांसाठी जनजागृती केली. आपली ही भूमिका सांगताना ते म्हणाले होते, भारतातील अस्पृश्यवर्ग शैक्षणिक दृष्ट्या उपेक्षित आहे राजकीय दृष्ट्या कमकुवत आहे. म्हणून मी त्यांच्या राजकीय सुरक्षिततेची मागणी करीत आहे डॉ. आंबेडकर केवळ विशिष्ट एका समाजाच्या विकासाचे एकमेव विचार करत होते असे नव्हे तर त्यांना भारतीय स्वातंत्र्याचेही भान होते. शिक्षण अंधश्रद्धा स्त्रियांची स्थिती अर्थकारण राजकीय किंवा प्रशासकीय व्यवस्था या मुद्द्यांकडेही त्यांचे लक्ष होते.(११)

निष्कर्ष:-

थोडक्यात असे दिसून येते की, डॉ.आंबेडकर ज्या समाजातून आले आणि त्यांच्यावर जातीव्यवस्थेमुळे समाजामध्ये जे अन्य अत्याचार झाले त्याचाच परिपाक म्हणजे त्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रबळ इच्छा निर्माण झाली. आणि त्यांनी आपला लढा चालू ठेवला.त्यासाठी त्यांनी वृत्तपत्रांचा आधार घेतला. कारण कृत्तपत्राच्या माध्यमातूनच समाजमनाचे खरे प्रतिबिंब घडते. वास्तविक पहाता डॉ.आंबेडकरांची पत्रकारिता ही काही पोटभरू किंवा प्रचारकी पत्रकारिता नव्हती तर तिला समाज उद्धाराचे राष्ट्रध्दाराचे मुलभूत अधिष्ठान लाभलेले होते. डॉ. बाबासहिबांची पत्रकारिता त्यावेळच्या पत्रकारितेपेक्षा अतिशय प्रतिकुल परिस्थितीशी सामना करणारी होती. म्हणूनच भिन्न होती. कारण एका बाजूला त्यांना दलित ,अशिक्षित, पिचललेल्या समाजाचे नेतृत्व करायचे होते. तर दुसरीकडे कमकुवत आर्थिक बाजू सांभाळायची होती. ह्या सगळ्या प्रतिकुल परिस्थितीवर मात करत डॉ. आंबेडकरांनी आपली पत्रकारिता चालू ठेऊनू निद्रिस्त अशा समाजाला जागृत करण्याचे महत्वाचे कार्य केले. एवढेच करून ते थांबले नाहीत तर त्यांनी लोकांना संघटित करून महाडचा सत्याग्रह ,काळाराम मंदिर सत्याग्रह ,यासारख्या चळवळी यशस्वी केल्या हे केवळ शक्य झाले ते त्यांच्या मराठी पत्रकारितेतील लेखनशैलीमुळेच म्हणूनच एक घटनात्मक कायदे तज्ञ, अर्थतज्ञ याच बरोबर एक उत्तम पत्रकार म्हणून डॉ.आंबेडकर अजरामर झाले.

आज 21 व्या शतकामध्ये देखील डॉ. आंबेडकरांच्या विचारांची भारतीय समाजाला गरज आहे. कारण त्यांचे विचार अमलात आणले तर भारतीय समाजात समता प्रस्थापित होऊन समाज नक्कीच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल.

**संदर्भसूची:-**

१) मुडे -पवार ,निशा (संपा),लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नवे आयाम, भारती मुद्रणालय 832 ई शाहूपुरी चौथी गल्ली कोल्हापूर 41 6001 पृ. 61

(२) कित्ता पृ. 61

३) कित्ता पृ.6

(४)कित्ता पृष्ठ 71 -72

(५)कीर धनजंय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्त्वविचार, प्रकाशन. 77 भागेश्वर भुवन, दिलीप गुफे मार्ग, मुंबई 16 पृ.२०

(6) https://mr. m. wikipedia.org

(७)कीर धनंजय - - डॉ..बाबासाहेब आबेडकर मानस आणि तत्वविचार उपरोक्त ५. (20-21)

(८) मुडे-पवार निशा, (संपा) लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नवे आयाम उपरोक्त ५-63-64

(९) बहिष्कुन भारत, पाक्षिक, 25 नोव्हे. 1927

(१०) https://mr. m. wikipedia-org (जनता वृत्तपत्र)

(११)मुडे पवार निशा संपादक उपरोक्त पृष्ठ 64- 65